# महाराष्ट्र शासन


## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल,जि.रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website: http://jdhepanvel.org

दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)


जा.क्र. विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१७ 1730 दि.22/6/17

**महत्वाचे व अति तात्काळ**

**परिपत्रक**

**विषय : केंद्रशासनाच्या विकलांगजन सशक्तीकरण विभागांतर्गत अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०१७-१८ च्या अंमलबजावणीबाबत...**

संदर्भ : मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/अपंग पीएमएस/२०१७-१८/७३४४, दि.२१.०६.२०१७

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, केंद्रशासनाच्या विकलांगजन सशक्तीकरण विभाग, नवी दिल्लीमार्फत अपंग विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे या उददेशाने अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. सदर ऑनलाईन शिष्यवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी उच्च शिक्षण उपविभागासाठी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणी उच्च शिक्षण विभागाकडुन होणे आवश्यक आहे. केंद्रशासनाच्या विकलांगजन सशक्तीकरण विभागामार्फत **अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०१७-१८** साठी राज्यामध्ये ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी आवश्यक असलेला अर्ज सोईस्करपणे उपलब्ध व्हावा व तो केव्हाही सहजरीत्या भरता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन (Fresh) व नुतनीकरण (Renewal) करण्यासाठी www.scholarship.gov.in या संकेतस्थळावरुन अर्ज मागविण्यात येत आहे. सदर संकेतस्थळ विद्यार्थ्यांच्या अर्जाच्या नोंदणीसाठी दिनांक ०१.०६.२०१७ पासुन खुले करण्यात आलेले आहे. त्याबाबत सविस्तर माहिती, जाहिरात तसेच मार्गदर्शक सूचना व वेळोवेळी प्राप्त झालेली इतर माहिती मा.संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहेत.

सदर शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी १८४० संच निर्धारीत केलेले आहेत. सदर शिष्यवृत्ती ११, १२ वी, पदवी व पदव्युत्तर डीग्री, तसेच डिप्लोमा व सर्टिफिकेट या अभ्यासक्रमांसाठी देण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी इयत्ता १० वी व १२ वी ची परिक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातुन तसेच उच्च परीक्षा मान्यताप्राप्त विद्यापीठातुन दिलेला विद्यार्थी अर्ज भरण्यासाठी पात्र असेल. सदर शिष्यवृत्तीची रक्कम ही विकलांगजन सशक्तीकरण विभाग, नवी दिल्ली यांचेमार्फत विद्यार्थ्यांचे आधार क्रमांकाशी संलग्न (Link) असलेल्या बँक खात्यावर जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे आधार क्रमांक ज्या बँक खात्याशी संलग्न (Link) केलेला आहे तोच खाते क्रमांक अर्जामध्ये भरणे आवश्यक आहे. जर आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न (Link) केलेला नसेल तर तो संलग्न (Link) करण्यासाठी विद्यार्थ्याला मार्गदर्शन करणे हे प्राचार्य/संस्थाप्रमुखांची जबाबदारी आहे.

**केंद्रशासनाकडुन सदर शिष्यवृत्ती नविन मंजुरीसाठी (Fresh) विद्यार्थ्यांनी अर्जाची ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ व नूतनीकरणाचा (Renewal) ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दिनांक ३० जुलै २०१७ अशी निर्धारीत करण्यात आलेली आहे.**

- **योजनेच्या प्रमुख अटी**

१. अर्जदार हा भारताचा रहिवासी असावा.

२. अर्जदाराची अपंगत्वाची टक्केवारी ४०% व त्यापुढील असावी.

३. अर्जदार मागील वर्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.

४. अजर्दार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती/ स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.

५. त्याच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. २.५० लाख इतकी आहे.

६. एका कुटुंबातील फक्त २ अपंग अपत्यापनांच सदर योजनेचा लाभ घेता येईल.

७. विद्यार्थ्यांचे स्वत:चे बँक खाते कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत असणे व ते त्याच्या आधार क्रमांकाशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे.

- **आवश्यक कागदपत्रे**

१. विद्यार्थ्याचा फोटो

२. मागील वर्षाची गुणपत्रिकेची छायांकित प्रत.

३. पालकांचे मा. तहसिलदार यांचेकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.

४. महाविद्यालयास चालु वर्षाची फि भरल्याची पावती.

५. बँक खाते पासबुकाच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.

६. विद्यार्थ्यांचा अपंगत्वाचा दाखला.

७. महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र

८. आधारकार्ड छायांकित प्रत (आधार कार्ड नसल्यास आधार नोंदणी पावती, पॅन कार्ड).

९. ड्रायव्हींग लायसन्सची छायांकित प्रत (असल्यास)

NSB २.० पोर्टलवरील मार्गदर्शक सूचनांनुसार रु. ५०,०००/- पेक्षा कमी शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या अर्जासोबतची कागदपत्रे महाविद्यालयांनी त्यांचे स्तरावर जतन करुन ठेवणे व रु. ५०,०००/- पेक्षा जास्त शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या अर्जदारांनी त्यांची कागदपत्रे पोर्टलवर Upload करणे आवश्यक आहे. तसेच सदर कागदपत्रे (महाविद्यालयात जमा केलेली व पोर्टलवर Upload केलेली) तपासूनच पात्र अर्ज त्वरीत ऑनलाईन फॉरवर्ड आवश्यक आहे व सदरची जबाबदारी पूर्णतः प्राचार्य/ संस्थाप्रमुख यांची राहील याची नोंद घ्यावी.

सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधीत प्राचार्य/संस्था प्रमुख यांची असेल. आपल्या महाविद्यालयात / संस्थेत शिक्षण घेत असणाऱ्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे आणि सदर शिष्यवृत्तीची जाहिरात आपल्या महाविद्यालयाच्या / संस्थेच्या दर्शनी भागावर झळकविण्यात यावी. तसेच त्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढुन घेवून तसेच त्यांच्या बँक खात्याशी संलग्न करुन घेण्यासही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

सदर शिष्यवृत्ती योजनेची जाहिरात, मार्गदर्शक सूचना वेळपत्रकासह www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून सदर परिपत्रकाद्वारेही सोबत जोडण्यात येत आहे.

सोबत : वरील प्रमाणे.

RBhosle
22/6/17

**विभागीय सहसंचालक,**
**उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल**

प्रति,

१. प्राचार्य/संस्थाप्रमुख, सर्व अधिनस्त अशासकिय अनुदानित व विना अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालये, जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

२. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई,

३. कुलसचिव, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई

प्रत : मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना माहितीस्तव सादर.